# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

## कार्यवृत्त

**Minutes of Meeting**

**बैठक क्रमांक** : 207

(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : सोमवार, दिनांक 23 फेब्रुवारी 2026

**(Day and Date)** : Monday, 23 March 2026

**वेळ** (Time) : सकाळी 11.30 वाजता (11.30 am)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## 207 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 207 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने सोमवार, दिनांक 23 मार्च 2026 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अक्र. | सदस्यांचे नाव | हुद्दा | उपस्थितीचा प्रकार |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ | अध्यक्ष | ऑफलाईन |
| 02 | मा. प्रा. वाल्मिक सरवदे, प्र-कुलगुरू<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | सदस्य | ऑनलाईन |
| 03 | मा. श्री. प्रसेनजित श्रीकृष्णा फडणवीस, पुणे | सदस्य | ऑनलाईन |
| 04 | मा. डॉ. दत्तात्रय मनोहर गुजराथी, नाशिक | सदस्य | ऑफलाईन |
| 05 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन,<br>इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिवर्सिटी, नवी दिल्ली | सदस्य | ऑनलाईन |
| 06 | मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई | सदस्य | ऑनलाईन |
| 07 | डॉ. अक्षया निकुंभ, मुंबई | सदस्य | ऑनलाईन |
| 08 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी<br>श्री. अनिल गावित नाशिक | सदस्य | ऑनलाईन |
| 09 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य | ऑफलाईन |
| 10 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ | निमंत्रित सदस्य | ऑफलाईन |
| 11 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी आणि<br>प्र-कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य सचिव | ऑफलाईन |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ | सदस्य |
| 02 | मा. डॉ. संजय भावे, मा. कुलगुरू<br>बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | सदस्य |
| 03 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 06 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 07 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

## व्यवस्थापन मंडळ बैठक
## Board of Management Meeting
## कार्यवृत्त (Minutes of the Meeting)

सोमवार, दिनांक 23 मार्च 2026 — वेळ – सकाळी 11.30 वाजता

Monday, 23 March 2026 — **Time : 11.30 am**

| अनु.क्रमांक<br>Subject No. | | तपशील<br>Details |
|---|---|---|
| 207.1 | 207.1.1 | **स्वागत**<br>मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. |
| | 207.1.2 | **मा. कुलगुरू महोदयांचे मनोगत**<br>मा. कुलगुरूंनी विद्यापीठाच्या वाटचालीबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिले.<br>1. या शैक्षणिक वर्षातील झालेल्या परीक्षांपैकी जवळ जवळ 80% परीक्षांचे निकाल 20 दिवसांच्या आत लावण्यात आले. तसेच सर्वच परीक्षांचे निकाल 30 दिवसांत लावण्यात आले. याची माहिती लोकभवन, मुंबई येथे पाठविण्यात आली होती. याबद्दल परीक्षा विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या परीश्रमांचे विशेष कौतूक आणि परीक्षा नियंत्रकांसह सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.<br>2. डॉ. राम ताकवले संशोधन केंद्रामार्फत सत्र 2024-25 या आर्थिक वर्षात संशोधन प्रकल्पासाठी अनुदान देण्यात आले आहे. या संशोधन प्रकल्पातील संशोधन प्रकल्प पूर्ण करून संशोधकांनी 2 संशोधन पेपर प्रकाशित करावे असे मार्गदर्शन करण्यात आले आहे. सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठी डॉ. राम ताकवले संशोधन केंद्रामार्फत हे काम सुरू आहे.<br>3. Down Syndrom Care Association, India या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने गतिमंद/मतिमंद पाल्य आणि त्यांच्या पालकांसाठी 2 दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी भारतातून तज्ज्ञ व्यक्तींना बोलावण्यात आले होते. यामध्ये साधारण 150 जणांनी सहभाग घेतला होता.<br>4. 'ज्ञानदर्शन' या संकल्पनेतून Multidiciplinary Research या विषयावर 3 दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.<br>5. विद्यापीठातील 2000 नारळाच्या झाडांच्या माध्यमातुन प्राप्त होणाऱ्या नारळापासून vergin coconut oil तेल निर्मिती प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. त्यास |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक त्या मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु असून लवकरच सदरची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.<br>6. विद्यापीठाच्या बारामती जिल्हा केंद्राच्या इमारतीच्या गुणवत्तेला पर्यावरणाचा गुणवत्ता पुरस्कार मिळाला आहे.<br>7. विद्यापीठाने या शैक्षणिक वर्षात विविध नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोलाहपूर, पालघर येथे दोन मेळावे, पनवेल, अंबेजोगाई, नागपूर, पुणे विभागीय केंद्रांच्या ठिकाणी रोजगार मेळावे घेतले आहे. तसेच नांदेड विभागीय केंद्रावर रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. या मेळाव्यात विविध कंपन्या सहभागी होत आहेत. सदर मेळाव्याच्या माध्यमातून 23 हजार विद्यार्थ्यांची नोंदणी होऊन सुमारे 1200 विद्यार्थ्यांना या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन नोकऱ्या मिळाल्या आहेत.<br>सर्व सन्माननीय सदस्यांना नववर्षाच्या शुभेच्छा देऊन मा. कुलगुरूंनी आपले मनोगत सादर केले. |
| 207.2 | 207.2.1 | **दिनांक 03 फेब्रुवारी, 2026 रोजी झालेल्या 206 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे**<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : दिनांक 03 फेब्रुवारी, 2026 रोजी झालेल्या 206 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त मा. व्यवस्थापन मंडळ सभेच्या सचिवांनी वाचून अवगत करून दिले. कार्यवृत्तास सर्वानुमते मान्यता देऊन कायम करण्यात आले. |
| | 207.2.2 | **दिनांक 03 फेब्रुवारी, 2026 रोजी झालेल्या 206 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल अवलोकनार्थ सादर**<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : दिनांक 03 फेब्रुवारी, 2026 रोजी झालेल्या 206 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल मा. व्यवस्थापन मंडळ सभेचे सचिव यांनी वाचून सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिला. कार्यवाहीच्या अहवालास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| 207.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 207.3.1<br>मूल्यमापन विभाग | **मूल्यमापन विभागातील अभिलेख/कागदपत्रे जतन कालावधी मान्यतेसाठी सादर..**<br>**टिपणी** – मूल्यमापन विभागातील अभिलेख/कागदपत्रांचा जतन कालावधी तयार करण्यात आलेला आहे.या संदर्भात मूल्यमापन सल्लागार समितीने अभिलेख जतन कालावधी ठराव क्र. 05.04.00 नुसार मंजूर झाला आहे. मूल्यमापन विभागातील अभिलेख जतन कालावधी व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : मूल्यमापन अभिलेखे जतन करण्याबाबत शासनात ज्या तरतुदी दिल्या आहेत त्या अनुषंगानेच अभ्यास करून समितीने अभिलेखे जतन करण्याबाबत शिफारशी केल्या आहेत. मूल्यमापन सल्लागार समितीने केलेल्या शिफारशींना सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |

| | | |
|---|---|---|
| | 207.3.2<br>प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र | **Adjunct Professor पद भरण्यासंदर्भात Search Committee ऐवजी Selection Committee स्थापन करण्याचा विषय व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – दि. ०३/०२/२०२६ रोजी झालेल्या २०६ व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील विषय क्र. २०६.३.३ अन्वये Adjunct Professor पद भरण्यासंदर्भातील विषय विचाराधीन होता. सदर ठरावानुसार UGC च्या नियमानुसार Search Committee गठित करण्यास मान्यता देण्यात आली होती. तथापि, UGC कडून Adjunct Professor नियुक्तीसाठी Search Committee स्थापन करण्यासंदर्भात कोणतेही नियम उपलब्ध नाहीत.<br>UGC च्या XII Plan Guidelines मधील UGC Guidelines for Empanelment of Adjunct Faculty in Universities and Colleges नुसार Adjunct Professor नियुक्तीसाठी Selection Committee स्थापन करण्याचे निकष दिलेले आहेत. त्या अनुषंगाने संबंधित निकषांनुसार Selection Committee स्थापन करण्याचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** Adjunct Professor पद भरण्याबाबतचा विषय दि. 03 फेब्रुवारी 2026 रोजी झालेल्या 206 व्या व्यवस्थापन मंडळात मंजूर करण्यात आला होता. परंतु विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांनुसार Search Committee ऐवजी Selection Committee स्थापन करून त्यानुसार कार्यवाही करण्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 207.3.3<br>आस्थापना कक्ष | **गट – ड (शिपाई) संवर्गातील विद्यापीठ निधीतून निर्मित 'सहायक' पदावर पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांचे शासनमान्य 'सहायक' पदांवर समायोजन तसेच संबंधित प्रकरणाबाबत गठित समितीचा अहवाल मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी** – अ) गट-ड (शिपाई) संवर्गातून 'सहायक' पदावर पदोन्नती दिलेल्या काही कर्मचाऱ्यांना, त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार व पदोन्नतीच्या मूळ दिनांकास उपलब्ध रिक्त पदांचा विचार करून, शासनमान्य रिक्त 'सहायक' पदांवर समायोजित करणे प्रस्तावित आहे. त्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांना प्रथम मूळ शिपाई पदावर पदावनत करून नंतर नियमानुसार पुनः पदोन्नतीद्वारे समायोजन करण्यात यावे.<br><br>आ) तसेच, अनुकंपा तत्त्वावर नियुक्त 01 कर्मचाऱ्यास शासनमान्य सरळसेवेच्या रिक्त 'सहायक' पदावर समायोजित करून त्याबाबतचा प्रस्ताव शासनास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठातील शासनमान्य गट-ड (शिपाई) संवर्गातून विद्यापीठ निधीतून निर्मित 'सहायक' पदावर पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांचे तसेच अनुकंपा तत्त्वावर सरळसेवेच्या कोट्यात नियुक्त कर्मचाऱ्याचे शासनमान्य 'सहायक' पदांवर समायोजन |

करण्याबाबत समितीने सादर केलेल्या अहवालाचा सविस्तर विचार करण्यात आला. समितीच्या शिफारशींचा विचार करता, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

1. गट-ड (शिपाई) संवर्गातून विद्यापीठ निधीतून निर्मित 'सहायक' पदावर पदोन्नती दिलेल्या श्री. धुमणे चिंतामण दशरथ. श्री. बोराडे पंकज शांताराम, श्री. पवार गोरख सिताराम, श्री. जेजुरे योगेश पर्बत, श्री. खरपडे राजू कृष्णा, श्री. रावडे संकेत रविंद्र, श्रीमती पोरजे शोभा रमेश, श्री. पगार योगेश विजय, श्रीमती पवार तेजस्वी पुंडलिक अशा एकूण 09 कर्मचाऱ्यांना शासनमान्य 'सहायक' पदोन्नती कोट्यातील उपलब्ध रिक्त 09 पदांवर समायोजित करण्यास मान्यता देण्यात आली.
2. सदर समायोजन करताना संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदावर (शिपाई) पदावनत करून, त्यानंतर सेवाज्येष्ठतेनुसार व संबंधितांच्या मूळ पदोन्नती दिनांकाच्या अनुषंगाने शासनमान्य 'सहायक' पदांवर पदोन्नती देऊन सामावून घेण्यात यावे.
3. विद्यापीठ निधीतून निर्मित सरळसेवेच्या कोट्यात अनुकंपा तत्त्वावर नियुक्त 01 कर्मचारी श्री. अभिषेक प्रकाश देशमुख यांना त्यांच्या रूजू दिनांकापासून शासनमान्य 'सहायक' पदाच्या सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदावर समायोजित करण्यास मान्यता देण्यात येते. सदर अनुकंपा नियुक्तीबाबत शासनाची कार्योत्तर मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा.
4. वरील समायोजन प्रक्रियेदरम्यान संबंधित कर्मचाऱ्यांना पदावनत केल्यामुळे कोणत्याही प्रकारची वेतन वसुली करण्यात येऊ नये.
5. समायोजनानंतर संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तिका, बिंदू नामावली व इतर अभिलेख अद्ययावत करण्यात यावेत.
6. सदर निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक ती पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यास कुलसचिव यांना अधिकार देण्यात यावे असे ठरले.

वरील सर्व शिफारशींना मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता प्रदान करण्यात आली.

207.3.4
नोंदणी कक्ष

**अनाथ आणि HIV बाधित विद्यार्थ्यांना मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणक्रमात संपूर्ण फी माफी सवलत मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**

टिपणी – 1. श्री. दायमी शोएब अहमद फजल अहमद यांनी दि. 20.01.2026 च्या इ-मेलनुसार महाराष्ट्र शासनाच्या महिला बाल विकास विभागामार्फत ज्या अनाथ विद्यार्थ्यांना अनाथ असल्याचे अधिकृत प्रमाणपत्र दिले जाते अशा विद्यार्थांना विद्यापीठाच्या शिक्षणक्रमात संपूर्ण फी माफ सवलत लागू करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

2. श्री. रूपेश त्र्यबंक भोसले यांच्या (या विद्यापीठात M.A. English शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या) विनंतीनुसार, ते HIV बाधित असून त्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांना कैदी आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांप्रमाणे या आणि पुढील शैक्षणिक वर्षाच्या शुल्कात पूर्णतः किंवा अंशतः सलवत मिळणेबाबत मागणी केली आहे.

श्री. दायमी शोएब अहमद फजल अहमद यांना अंध विद्यार्थ्यांप्रमाणे अनाथ विद्यार्थ्यांसाठी

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठाच्या शिक्षणक्रमात संपूर्ण फी माफी सवलत आणि श्री. रूपेश त्र्यबंक भोसले यांच्या विनंतीनुसार HIV बाधित असल्याने कैदी व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांप्रमाणे या तसेच पुढील शैक्षणिक वर्षाच्या शुल्कात पूर्ण किंवा अंशतः सवलत मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठातून यापूर्वीपासून अंध विद्यार्थी, कैदी, ट्रान्सजेंडर अशांना रुपये 10/- इतक्या नाममात्र शुल्कावर प्रवेश दिला जातो. त्याच धर्तीवर अनाथ आणि HIV बाधीत अशा विद्यार्थ्यांना आपल्या सॉफ्टवेअरमध्ये नोंद होण्यासाठी रुपये 10/- इतक्या नाममात्र शुल्काद्वारे प्रवेश देण्यात यावा. परंतु सेवांतर्गत बी.एड. शिक्षणक्रम, शालेय व्यवस्थापन पदविका हे शिक्षणक्रम सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी असल्यामुळे असे विद्यार्थी अर्थार्जन करत असतात म्हणून सेवांतर्गत बी.एड. शिक्षणक्रम आणि शालेय व्यवस्थापन पदविका या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ही सुविधा देण्यात येऊ नये असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला व या निर्णयाला सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 207.3.5<br>वित्त विभाग | **दि. 14 मार्च, 2026 रोजी आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — दि. 14 मार्च, 2026 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दि. 14 मार्च, 2026 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्तावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार वित्त समिती बैठकीतील विषय क्र. 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 20, 21, 22, कार्योत्तर मान्यतेचे विषय क्र. 1 ,2 व 3 तसेच मा. कुलगुरू महोदय यांचे मान्यतेने घेतलेले ऐनवेळचे विषय क्र. 1 व 2 करिता सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे विषय क्र. 19 वर वित्त समिती बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यास वित्त समितीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात येऊन अंतिम मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत शिफारस करण्यात आली होती.<br>त्यानुसार बैठकीत सविस्तर चर्चा होऊन विद्यापीठाचे लेखापरीक्षक ए. एस. बेदमुथा यांना आर्थिक वर्ष 2025-26 व 2026-27 या दोन वर्षांकरिता विद्यापीठाचे लेखापरीक्षण करण्यास व त्यानुषंगाने त्यांचे व्यावसायीक शुल्क प्रती वर्ष रू. 2,58,750/- (रुपये दोन लक्ष अठ्ठावण्ण हजार सातशे पन्नास फक्त) (जीएसटी सह) इतके व्यावसायीक शुल्क देण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 207.3.6<br>वित्त विभाग | **विद्यापीठाचा आर्थिक वर्ष 2025-26 चा सुधारित अर्थसंकल्प व सन 2026-27 चा प्रस्तावित अर्थसंकल्प मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी** — विद्यापीठाचा आर्थिक वर्ष 2025-26 चा सुधारित अर्थसंकल्प व सन 2026-27 चा प्रस्तावित अर्थसंकल्प या दोनही अर्थसंकल्पांना वित्त समितीच्या बैठक क्र. 27/2025-26 दि. 14 मार्च 2026 रोजी झालेल्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली. सदर अर्थसंकल्प मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाचा आर्थिक वर्ष 2025-26 सुधारित अर्थसंकल्प व 2026-27 च्या प्रस्तावित अर्थसंकल्प मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत अंतिम मान्यतेकरिता सादर करण्यात आला. वित्त अधिकारी यांनी सदरचा अर्थसंकल्पाचे सादरीकरण केले. सदर अर्थसंकल्पावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदरच्या 2026-27 च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित एकूण उत्पन्न हे रू. 686 कोटी इतके तर रू. 755 कोटी इतका खर्च प्रस्तावित आहे. या अर्थसंकल्पात रू. 69 कोटी ची तुट आहे यास सर्व सन्माननीय सदस्यांनी एकमताने मान्यता प्रदान केली. सदरचा अर्थसंकल्प सर्वसमावेशक असल्याचे सर्व सन्माननीय सदस्यांनी सांगीतले. त्यानुसार सदरचा अर्थसंकल्प विद्यापीठाच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने योग्य असून वित्त अधिकारी यांनी जी आर्थिक शिस्त निर्माण केली आहे त्याबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांनी वित्त अधिकारी यांचे अभिनंदन केले तसेच वित्त अधिकारी व वित्त विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित केला. |
| | 207.3.7<br>सभा दप्तर कक्ष | **विद्याभारती संस्था, वर्धा व विद्यापीठ यांच्यामध्ये "लीव्ह ॲण्ड लायसन्स करार" या कराराचा मसुदा मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ...**<br>**टिपणी —** विद्याभारती संस्था, वर्धा यांच्या बेसा, नागपूर येथील संकुलातील इमारतीमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, संगणक एज्युकेशनकरिता लॅब, अभ्यासिका, कार्यालय इत्यादी सुरू केल्यास विदर्भातील विद्यार्थ्यांना त्याचा निश्चितपणाने फायदा होऊ शकतो अशा आशयाची सविस्तर चर्चा होऊन अत्यंत अधुनिक पध्दतीने केंद्र स्थापन करण्यात यावे असेही ठरले. यासाठी सदर संस्थेबरोबर सामंजस्य करार करून भाडे निश्चिती शासकीय दराप्रमाणे करून घेण्यात यावी व त्वरीत सदर केंद्राची उभारणी तातडीने करून कार्यान्वित करावी, असे व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 206.3.6 अन्वये मंजूर करण्यात आले.<br>सामंजस्य कराराचा मसुदा तपासणीसाठी विद्यापीठाच्या कायदेशीर सल्लागार यांना पाठविण्यात आला होता. कायदेशीर सल्ल्यानुसार सामंजस्य कराराऐवजी "लीव्ह ॲण्ड लायसन्स करार" असणे संयुक्तिक ठरेल. त्यानुसार "लीव्ह ॲण्ड लायसन्स करार" चा मसुदा **मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विदर्भामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची उपयोगिता लक्षात घेऊन विद्याभारती संस्था, वर्धा यांच्या बेसा, नागपूर यांचेबरोबर विद्यापीठाने उचललेले पाऊल अतिशय स्तुत्य आहे. अशाच प्रकारे मराठवाडा येथेही केंद्र उभारण्याबाबतची सुचना सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रस्तावित केली व सदर सेंटर लातूर येथे करण्याचे मा. कुलगुरू यांनी जाहीर केले व त्यास सर्वानुमते मान्यता प्रदान केली.<br>बेसा नागपूर येथे होणाऱ्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व कौशल्य विकास केंद्राच्या स्थापनेसाठी आवश्यक असलेला खर्च ज्यात संगणके, फर्निचर, इंटरॲक्टीव क्लासरुम, अभ्यासिकेसाठी लागणारे फर्निचर, ग्रंथालय इत्यादीसाठी होणाऱ्या सर्व खर्चासही सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच विद्याभारती संस्था, वर्धा यांच्यासमवेत सामंजस्य कराराऐवजी "लीव्ह ॲण्ड लायसन्स करार" चा करार करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास ज्यात इमारत भाडे व इतर किरकोळ खर्च संबंधीत संस्थेस मासिक पध्दतीने अदायगी करण्यासही सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. सादर केलेल्या कराराच्या मसुद्यास **मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी चर्चा करून मान्यता प्रदान केली.** |

207.3.8
आस्थापना कक्ष

**श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे, करारावरील स्वीय सहायक (विवक्षित), मा. कुलगुरू कार्यालय यांच्या पुर्ननियुक्तीबाबत...**

**टिपणी** — विद्यापीठामध्ये करार पद्धतीने एकत्रित वेतनावर मनुष्यबळ नियुक्त करताना विद्यापीठ अधिनियम XX, 1989 मधील कलम 2 मधील (9सी) अंतर्गत तरतुदीनुसार मा. कुलगुरूंना किमान 6 महिने व कमाल 1 वर्ष कालावधीपर्यंत नियुक्ती करण्याचे अधिकार आहेत. तसेच विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये एकूण 3 वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरतूद असून त्यापैकी 2 वर्षे मा. कुलगुरू यांच्या अधिकारात व उर्वरित 1 वर्ष व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करता येते. श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे यांची करारावरील नियुक्ती विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) तसेच विद्यापीठ अधिनियमातील तरतुदीनुसार करण्यात आलेली आहे. विद्यापीठात त्यांची तात्पुरत्या स्वरूपातील एकूण सुमारे 6 वर्ष सेवा झालेली आहे. मा. कुलगुरू यांच्या अधिकारात देण्यात आलेल्या 2 वर्षांच्या नियुक्तीचा कालावधी दि. 05.03.2026 रोजी संपुष्टात आलेला आहे.

सध्या श्री. हिरे यांचा विद्यापीठ परिनियम 11 (2 of 1993) नुसार देण्यात आलेला 2 वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला असून, त्यांना व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने पुढील 1 वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देता येऊ शकते. सध्या पदभरतीस मान्यता नसल्यामुळे सदर पद नियमितरीत्या भरता आलेले नाही.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीव्हीई-1525/प्र.क्र.37/आस्थामं (का.3), दि. 10.06.2025 नुसार करार पद्धतीने नियुक्त व्यक्ती वयाच्या 65 वर्षांपर्यंत कार्यरत राहू शकतात व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने सेवा कमाल 70 वर्षांपर्यंत ठेवता येते. तसेच मा. व्यवस्थापन मंडळ सभा दि. 08.10.2024, ठराव क्र. 196.4.2 नुसार करारावरील सेवेसाठी उच्च वयोमर्यादा 70 वर्षांपर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे यांची जन्मतारीख 03.02.1962 असून सध्या त्यांचे वय 64 वर्षे 1 महिना आहे.

श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे, करारावरील स्वीय सहायक (विवक्षित), मा. कुलगुरू कार्यालय यांच्या पुढील 1 वर्ष कालावधीच्या पुर्ननियुक्तीस व दि. 10.10.2025 रोजीच्या परिपत्रकात नमूद अटी व शर्तीनुसार, Pay Minus Pension तत्वावर रु. 74,662/- इतके प्रतीमाह एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यास मा. कुलगुरू यांनी मान्यता दिलेली असून सदरचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : विद्यापीठातील रिक्त पदांसाठी अद्याप नियमित भरती प्रक्रिया सुरू झालेली नसल्यामुळे, रिक्त झालेल्या पदांवर पूर्वी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना कराराच्या तत्वावर पुर्ननियुक्त करणे आवश्यक ठरत आहे.

त्याअनुषंगाने, विद्यापीठाच्या परिनियमांनुसार मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक म्हणून कार्यरत असलेले श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे, करारावरील स्वीय सहायक (विवक्षित), यांची पुढील १ (एक) वर्ष कालावधीसाठी पुर्ननियुक्ती करण्यास, तसेच दि. 10.10.2025 रोजीच्या

| | | |
|---|---|---|
| | | परिपत्रकात नमूद अटी व शर्तीनुसार Pay Minus Pension तत्वावर रु. 74,662/- (रुपये चौ-हत्तर हजार सहाशे बासष्ट फक्त) इतक्या प्रतिमाह एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यास मा. कुलगुरूंनी दिलेल्या मान्यतेस मा. व्यवस्थापन मंडळाने कार्योत्तर मान्यता प्रदान करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात येत आहे. |
| | 207.3.9<br>परीक्षा<br>विभाग | **विद्यापीठाचा मूल्यमापन विभाग परीक्षा विभागात विलिन करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ...**<br>**टिपणी —** विद्यापीठात सद्यस्थितीत परीक्षा विभाग व मूल्यमापन विभाग हे दोनही विभाग मा. कुलगुरू महोदयांच्या अधिपत्याखाली स्वतंत्रपणे कार्यरत आहेत. परीक्षा विभागाचे प्रमुख परीक्षा नियंत्रक तर मूल्यमापन विभागाचे प्रमुख संचालक आहेत. परीक्षा विभागाकडून परीक्षा पूर्व आणि परीक्षे नंतर निकाल लावण्यापर्यंतची कामे केली जातात. तसेच दीक्षांत समारंभाचे आयोजन करून पदवी / पदविकांचे वाटप केले जाते. मूल्यमापन विभागाकडून अभ्यासक्रमनिहाय प्रश्नपेढी विकसित करून त्यातून प्रश्नपत्रिका तयार करण्याचे मुख्य काम केले जाते. थोडक्यात परीक्षा आयोजन व निकालाची जबाबदारी परीक्षा विभागाकडे तर प्रश्नपत्रिका तयार करण्याची जबाबदारी मूल्यमापन विभागाकडे आहे.<br>वस्तुतः वरील दोनही विभागांची कामे ही परीक्षेशी निगडीत आहेत. प्रश्नपत्रिका तयार करण्याची जबाबदारी मूल्यमापन विभागाची असल्याने अनेक वेळा ऐन परीक्षेवेळी धावपळ होते. जबाबदाऱ्या दोन विभागात विभागल्याने तसेच परीक्षेत किंवा प्रश्नपत्रिकेत काही गोंधळ निर्माण झाल्यास जबाबदारी निश्चित करणे अडचणीचे ठरते.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 17 नुसार संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ असे पद निर्माण केलेले असून ते विद्यापीठाच्या परीक्षा घेणे व मूल्यमापन करणे, त्यांचे निकाल जाहीर करणे या गोष्टींचा मुख्य प्रभारी अधिकारी आहेत. प्रश्नपत्रिका छापून घेण्याची व्यवस्थाही त्यांचेकडे आहे.<br>वरील मुद्दे विचारात घेता परीक्षा विभागात मूल्यमापन विभाग विलिन करून परीक्षा विभागाचे प्रमुख 'परीक्षा नियंत्रक' यांचे नियंत्रणाखाली परीक्षा विभागाने कामकाज करणे प्रशासकीयदृष्ट्या सोयीचे ठरणार आहे. परीक्षा विभागात Pre-Exam Confidential Cell निर्माण करून सोबत जोडलेल्या माहितीप्रमाणे त्यांचेकडे जबाबदारी सोपविण्यात येईल. या कक्षाचा Organizational Chart सोबत जोडल्याप्रमाणे असेल.<br>उपरोक्त बाब विचारात घेता मूल्यमापन विभाग परीक्षा विभागात विलिन करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** महाराष्ट्रातील पारंपरिक सर्व विद्यापीठांमध्ये मूल्यमापन विभाग हे परीक्षा विभागाचा अविभाज्य भाग म्हणून कार्यरत आहे. त्याअनुषंगाने तसेच प्रशासकीय कार्यक्षमता व सुसूत्रता वाढविण्याच्या दृष्टीने, विद्यापीठातील मूल्यमापन विभाग परीक्षा विभागात विलीन करण्याचा प्रस्ताव विचारार्थ मांडण्यात आला.<br>वरील प्रस्ताव विचारात घेता परीक्षा विभागात मूल्यमापन विभाग विलिन करून परीक्षा विभागाचे प्रमुख 'परीक्षा नियंत्रक' यांचे नियंत्रणाखाली परीक्षा विभागातील सर्व कक्षाचे कामकाज चालेल ज्यात मूल्यमापन कक्षाचे कामकाज Pre-Exam Confidential |

| | | |
|---|---|---|
| | | Cell या शीर्षाखाली चालेल. असे करणे प्रशासकीयदृष्ट्या सोयीचे ठरणार आहे. सदर प्रस्तावाचा सविस्तर विचार करून, मूल्यमापन विभाग परीक्षा विभागात विलीन करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी एकमताने मान्यता प्रदान केली. |
| | 207.3.10<br>कृषी विज्ञान केंद्र | **कृषी विज्ञान केंद्रामार्फत "यश कल्पतरू प्रशिक्षण व प्रक्रिया युनीट" स्थापन करण्याविषयीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी** — कृषी विज्ञान केंद्रामार्फत तयार करण्यात येणाऱ्या "यश कल्पतरू प्रशिक्षण व प्रक्रिया युनीट" अंतर्गत नारळाच्या फळांची साल काढून वाळविणे व वाळविलेल्या खोबऱ्यापासून ऑईल एक्सट्रॅक्शन मशीनद्वारे Virgin Oil (High Quality, Un-refined oil extracted solely through mechanical means without the use of chemical and heat) ची निर्मिती करण्यात येईल. या उत्पादनासाठी FSSAI परवाना घेण्यात येणार आहे. सदर केंद्र स्थापनेबाबतचा प्रस्ताव **मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** "यश कल्पतरू प्रशिक्षण व प्रक्रिया युनीट" स्थापना करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान केली. तसेच या उपक्रमाद्वारे नारळ तेलासह इतर विविध सहायक उत्पादने जसे की, कोकोपीट आणि झाडणी, दोर अशा प्रकारची उत्पादने करण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे आदिवासी महिलांना प्रशिक्षित करण्यात येऊन रोजगार निर्मिती करण्यास सहाय्यभूत ठरणार आहे. याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी मा. कुलगुरू आणि कृषी विज्ञान केंद्राचे अभिनंदन केले. यासाठी आवश्यक त्या पुढील मान्यता आणि परवाने घेण्याची कार्यावाही सुरू आहे. त्यानुसार या उपक्रमास सर्वानुमते मान्यता प्रदान केली. |
| | 207.3.11<br>आस्थापना कक्ष | **श्री. भटुप्रसाद प्रभाकर पाटील, परीक्षा नियंत्रक यांच्या सेवानिवृत्ती अनुषंगाने त्यांच्या धारणाधिकार समाप्ती व पुढील तात्पुरत्या नियुक्तीबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ...**<br>**टिपणी** — श्री. भटुप्रसाद प्रभाकर पाटील, परीक्षा नियंत्रक यांच्या सेवानिवृत्ती अनुषंगाने त्यांच्या धारणाधिकार समाप्ती व पुढील तात्पुरत्या नियुक्तीबाबत....<br>1. श्री. भटुप्रसाद प्रभाकर पाटील हे विद्यापीठात **परीक्षा नियंत्रक** या पदावर धारणाधिकारावर दि. 02.07.2021 पासून कार्यरत आहेत.<br>2. श्री पाटील यांची प्रस्तुत विद्यापीठात परीक्षा नियंत्रक या पदावरील नियुक्ती धारणाधिकार तत्त्वावर पाच वर्षे अथवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अशी मंजूर करण्यात आलेली असून, त्याबाबतची नोंद त्यांच्या मुळसेवापुस्तकात उपलब्ध आहे.<br>3. श्री. पाटील हे त्यांच्या मूळसेवेतील संगणक केंद्र प्रमुख या मूळपदावरून दि. 31.5.2026 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.<br>4. त्याअनुषंगाने या विद्यापीठातील परीक्षा नियंत्रक पदावरील नियुक्तीचा कालावधी दि. 01.07.2026 पर्यंत असला तरी, ते दि.31.05.2026 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा धारणाधिकार हा संपुष्टात येत आहे. |

5. परिणामी, श्री. पाटील यांची परीक्षा नियंत्रक पदावरील नियुक्ती त्यांच्या मूळपदावरील **दि.** 31.05.2026 **रोजीच्या सेवानिवृत्तीमुळे आपोआप संपुष्टात येत असून**, सदरचे पद रिक्त होत आहे. सदरचे पद नियमित पद्धतीने भरण्याची प्रक्रिया वेळेत तातडीने पूर्ण होणे जिकरीचे असल्याने, श्री. पाटील यांना तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्याबाबत संदर्भांकित प्रस्तावानुसार **मा. कुलगुरूंनी मान्यता प्रदान केलेली आहे**.
6. तसेच, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीबीई 1525/प्र.क्र. 37/आस्थामं (का.13), दि. 10.06.2025 नुसार नुसार शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने घेण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार अशा नियुक्तीच्या वेळी अधिकाऱ्यास मिळणारे मूळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मूल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्याची तरतूद आहे.
7. तसेच विद्यापीठाच्या परिनियम क्र. 11 (2 of 1993) – Statute to Provide for Appointment of Persons on Fixed Tenure Contract Basis of the University नुसार अशी नियुक्ती करता येते.

परीक्षा नियंत्रक हे पद अत्यंत महत्त्वाचे असल्याने या पदाची नियमित भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कामकाज सुरळीत राहावे या दृष्टीने, मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार श्री. पाटील यांना दि. 01.06.2026 ते 31.08.2026 या कालावधीसाठी, महाराष्ट्र शासनाच्या दि. 10.06.2025 च्या शासन निर्णयानुसार व विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये तात्पुरत्या स्वरूपात करार पद्धतीने नियुक्ती देण्याबाबतचा विषय व्यवस्थापन मंडळापुढे विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** श्री. भटुप्रसाद पाटील हे मा. व्यवस्थापन मंडळाचे निमंत्रित सदस्य आहेत. त्यामुळे मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ते उपस्थित असतात. परंतु सदर विषय हा त्यांचेशी निगडित असल्याने त्यांना या विषयापुरते सभेत अनुपस्थित रहाण्याची सर्वानुमते मान्यता दिली.

श्री. भटुप्रसाद पाटील हे नियत वयोमानानुसार दि. 31.05.2026 रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. सबब परीक्षा नियंत्रक हे नियमित पद रिक्त होणार आहे. विद्यापीठाचा परीक्षा विभाग अत्यंत महत्वाचा विभाग असून, विद्यापीठात मे महिन्यात उन्हाळी परीक्षा होणार असल्याने, नियमित परीक्षा नियंत्रक पदाची भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत महाराष्ट्र शासनाच्या दि. 10.06.2025 च्या शासन निर्णयानुसार व विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये तात्पुरत्या स्वरूपात करार पद्धतीने श्री. भटुप्रसाद पाटील यांना दि. 01.06.2026 पासून पुढील 1 वर्षासाठी करारावर परीक्षा नियंत्रक म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली. त्यात प्रथम 6 महिन्यांसाठी आणि तद्नंतर कराराची मुदत पुढील 6 महिने वाढविण्याचा अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आला.

सदर विषयावरचा ठराव संमत झाल्यानंतर श्री. भटुप्रसाद पाटील यांना सभेत उपस्थित रहाण्याची मान्यता देण्यात येऊन त्यांना बोलावण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| | 207.3.12<br>आस्थापना कक्ष | **विद्याशाखानिहाय शिक्षणक्रम मान्यतेसाठी विद्यापीठ अनुदान मंडळाच्या निकषांनुसार करारावर Academic Coordinator (Assistant Professor on Contract Basis) यांची जाहिरात क्र.** YCMOU/EST/ 2026/01 **मध्ये नमूद केलेल्या अटी, शर्तींनुसार आणि सदर जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे प्रती महिना रु. 50,000/- इतक्या एकत्रित वेतनावर सदरची एकूण 55 पदे भरण्याच्या मान्यतेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी –** विद्याशाखानिहाय शिक्षणक्रम मान्यतेसाठी UGC च्या निकषांनुसार करारावर Academic Coordinator (Assistant Professor on Contract Basis) यांची जाहिरात क्र. YCMOU/EST/2026/01 मध्ये नमूद केलेल्या अटी, शर्तींनुसार आणि सदर जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे प्रती महिना रु. 50,000/- इतक्या एकत्रित वेतनावर सदरची एकूण 55 पदे भरण्याच्या मान्यतेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** सदर प्रस्तावाचा सविस्तर विचार करून, UGC/AICTE/ICAR/RCI/NCTE/NMC तसेच शासनाचे सर्व निकष पाळून वरीलप्रमाणे नमूद 55 पदे करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास तसेच त्यासाठी आवश्यक त्या पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी एकमताने मान्यता प्रदान करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच आवश्यकेनुसार पदांची संख्या कमी अधिक करण्याचा अधिकार मा. व्यवस्थापन मंडळाने मा. कुलगुरू महोदय यांना प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे त्यांच्या वेतनावर होणाऱ्या खर्चासही सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 207.3.13<br>परीक्षा कक्ष | **एम.एड. शिक्षणशास्त्र (M.Ed.) शिक्षणक्रमासाठी प्रदान करण्यात येणाऱ्या सुवर्णपदाकाबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी –** दिनांक 10 मार्च 2026 रोजी परीक्षा मंडळाची 59 वी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.<br>**1.** एम.एड. शिक्षणक्रम बंद झाल्याने एम.एड. शिक्षणक्रमासाठी प्रदान करण्यात येणारे सुवर्णपदक रद्द करण्यात यावे.<br>**2.** एम.एड. शिक्षणक्रमासाठी यापूर्वी ज्या निकषांच्या आधारे सुवर्णपदक प्रदान करण्यात येत होते, त्याच निकषांप्रमाणे एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमांसाठी सुवर्णपदक प्रदान करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>**3.** उपरोक्त शिफारस व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सादर करावी असे सर्वानुमते ठरले.<br>मा. परीक्षा मंडळाने दिनांक 10 मार्च 2026 रोजी झालेल्या 59व्या बैठकीत केलेल्या वरील शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 10 मार्च 2026 रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या 59 वी बैठकीतील ठरावानुसार<br>**1.** एम.एड. हा शिक्षणक्रम बंद झाला असल्याने एम.एड. शिक्षणक्रमासाठी प्रदान |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात येणारे सुवर्णपदक रद्द करण्यात यावे.<br>**2.** एम.एड. शिक्षणक्रमासाठी यापूर्वी ज्या निकषांच्या आधारे सुवर्णपदक प्रदान करण्यात येत होते, त्याच निकषांप्रमाणे एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमांसाठी सुवर्णपदक प्रदान करण्यात यावे.<br><br>वरील दोनही शिफारशींना मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 207.3.14<br>आस्थापना कक्ष | **विद्याशाखानिहाय शिक्षणक्रम मान्यतेसाठी विद्यापीठ अनुदान मंडळाच्या निकषांनुसार करारावर तात्पुरत्या स्वरुपात Senior Coordinator (Assistant Professor on Contract Basis) यांची जाहिरात क्र**. YCMOU/EST/ 2026/02 **मध्ये नमूद केलेल्या अटी, शर्तीनुसार आणि सदर जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे प्रती महिना एकत्रित रु. 40,000/- इतक्या वेतनावर सदरची एकूण 30 पदे भरण्याच्या मान्यतेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी** — विद्याशाखानिहाय शिक्षणक्रम मान्यतेसाठी UGC च्या निकषांनुसार करारावर करारावर तात्पुरत्या स्वरुपात Senior Coordinator (Assistant Professor on Contract Basis) यांची जाहिरात क्र. YCMOU/EST/2026/02 मध्ये नमूद केलेल्या अटी, शर्तीनुसार आणि सदर जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे प्रती महिना एकत्रित रु. 40,000/- इतक्या वेतनावर सदरची एकूण 30 पदे भरण्याच्या मान्यतेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. व्यवस्थापन मंडळाच्या 195 व्या बैठकीतील मान्य ठरावातील मुद्दा क्रमांक 8 अन्वये Senior Coordinator (Assistant Professor on Contract Basis) या पदासाठी प्रती महिना एकत्रित रु. 40,000/- इतक्या वेतनावर मंजूर करण्यात आले होते. त्याच अनुषंगाने सदर प्रस्तावाचा सविस्तर विचार करून, UGC/ AICTE/ ICAR/ RCI/ NCTE तसेच शासनाचे सर्व निकष पाळून वरीलप्रमाणे Senior Coordinator (Assistant Professor on Contract Basis) नमूद 30 पदे एकत्रित रु. 40,000/- प्रमाणे करारा तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच याव्यतिरिक्त चार पदे परीक्षा विभागाच्या अंतर्गत देण्यात आलेल्या Pre-Examination Cell करिता देण्यासही मान्यता प्रदान करण्यात आली. अशी एकूण 34 पदे जाहिरातीद्वारे भरण्यास व त्यासाठी होणाऱ्या वेतनीय खर्चास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे त्यासाठी आवश्यक त्या पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी एकमताने मान्यता प्रदान केली. तसेच आवश्यकेनुसार या पदांची संख्या कमी अधिक करण्याचा अधिकार मा. व्यवस्थापन मंडळाने मा. कुलगुरू महोदय यांना प्रदान करण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| 207.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 207.4.1<br>ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे "आपले सरकार सेवा केंद्र" स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — विद्याशाखानिहाय सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये "आपले सरकार सेवा केंद्र" (ASSK) स्थापन करण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर शासन निर्णयानुसार, ज्या महाविद्यालयांकडून / विद्यापीठाकांकडून मागणी करण्यात येईल, त्यांना संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आवश्यक ती मंजुरी दिली जाते, तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी), मुंबई यांच्याशी तांत्रिक सहाय्याकरिता समन्वय साधावयाचा आहे.<br><br>विद्यापीठात राज्यातील लाखो विद्यार्थी विविध अभ्यासक्रमांकरिता नोंदणीकृत आहेत. विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक दाखले, प्रमाणपत्रे तसेच विविध शासकीय सेवांचा लाभ सुलभरीत्या उपलब्ध व्हावा, याद्दष्टीने विद्यापीठ परिसरात "आपले सरकार सेवा केंद्र" स्थापन करणे अत्यंत उपयुक्त व आवश्यक वाटते. करिता, आपले सरकार सेवा केंद्र विद्यापीठामध्ये स्थापन करण्याबाबत मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** "आपले सरकार सेवा केंद्र" (ASSK) विद्यापीठात स्थापन करण्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. तसेच असेच केंद्र विद्यापीठाच्या इतरही 8 विभागीय केंद्रांमध्ये स्थापन करण्याची सुचना केली. या सुचनेचे मा. कुलगुरूंनी स्वागत केले तसेच या सुचनेनुसार केंद्र स्थापन करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 207.4.2 | **विद्यापीठाकडून विविध सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता Section 8 कंपनी स्थापन करणेबाबतचा विषय निर्णयास्तव सादर.**<br><br>**टिपणी :** विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्र, रिसर्च, इनोवेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस विभाग, परीक्षा विभाग, वित्त विभाग, शैक्षणिक विभाग, इत्यादींमार्फत विविध प्रकारच्या सेवा, वस्तु, तज्ज्ञ सल्लागार सेवा, नाविण्यापुर्ण उपक्रमाद्वारे सुविधा, पेटेंडेड प्रॉडक्टस् / सर्व्हिसेस इत्यादी सेवा व सुविधा इतर शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, शासनमान्य संस्था, उद्योग, सेवाभावी संस्था व समाजातील विविध घटक यांना माफक दराने पुरविण्यासाठी / देण्यासाठी शुल्क आकारणे गरजेचे आहे.<br><br>विद्यापीठाचा मुख्य उद्देश समाजाच्या शैक्षणिक गरजा भागविणे हा आहे. त्यामुळे शिक्षणाशिवाय इतर सेवा व सुविधा पुरविण्यासाठी प्रचलित शासनाच्या कायद्यानुसार नोंदणी करणे, GST क्रमांक घेणे व व्यावसायीक व्यवहार करणेकरिता नोंदणीकृत आस्थापनेची गरज असते. त्यामुळे कंपनी कायदा 2013 मधील कलम 8 नुसार विद्यापीठाने कंपनीचे गठन केल्यास उपरोक्त सर्व सेवा ह्या व्यावसायीक पध्दतीने शुल्क आकारून देता येतील. यासाठी सदर कायद्यातील कलमानुसार स्थापन झालेल्या या कंपनीस स्वत:चे Memorandum of Association व Artical of Association या तयार करून नोंदणी |

| | | |
|---|---|---|
| | | करून घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कंपनीचा व्यवहार करता येईल. या कंपनीसाठी स्वतंत्र कार्यकारी मंडळ असते व त्यांच्यामार्फत दैनंदिन व्यवहार केला जातो.<br><br>तरी वरीलप्रमाणे कंपनी कायदा 2013 च्या कलम 8 नुसार विद्यापीठात वरीलप्रमाणे कंपनी स्थापन करावी यास्तव सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** कंपनी कायदा 2013 कलम 8 नुसार कंपनी स्थापन करण्याच्या विषयावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यापीठाचा मुख्य उद्देश समाजाच्या शैक्षणिक गरजा भागविणे हा आहे. त्यामुळे शिक्षणाशिवाय इतर सेवा व सुविधा पुरविण्यासाठी प्रचलित शासनाच्या कायद्यानुसार नोंदणी करणे, GST क्रमांक घेणे व व्यावसायीक व्यवहार करणेकरिता नोंदणीकृत आस्थापनेची गरज असते. त्यामुळे कंपनी कायदा 2013 मधील कलम 8 नुसार विद्यापीठाने कंपनीचे गठन केल्यास उपरोक्त सर्व सेवा ह्या व्यावसायीक पध्दतीने शुल्क आकारून देता येतील. त्यामुळे वरील प्रमाणे कंपनी कायदा 2013 मधील कलम 8 नुसार कंपनी स्थापन करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे त्यासाठी सनदी लेखापालाची नियुक्ती करण्यास देखील मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच सदर कंपनीसाठी स्वतंत्र कार्यकारी मंडळ नेमण्याचा अधिकार मा. कुलगुरू महोदय यांना सर्वानुमते प्रदान करण्यात आले. |
| | 207.4.3<br>आस्थापना कक्ष | **शैक्षणिक संयोजक (सहायक प्राध्यापक लेव्हल) यांच्या करारावरील मुदतवाढी बाबत ऐनवेळेचा विषय मा व्यवस्थापन मंडळासमोर सादर.**<br><br>**टिपणी :**<br>1. विद्यापीठात करारावर एकत्रित वेतनावर मनुष्य नियुक्त करताना विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये एकूण 3 वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरतूद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्ष व एक वर्ष व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करता येते.<br>2. सोबत जोडलेल्या यादीतील शैक्षणिक संयोजक (सहायक प्राध्यापक लेव्हल) यांचा विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये एकूण 2 वर्ष कालावधी संपुष्टात आलेला आहे. विद्यापीठाने जाहिरात क्र. YCMOU/EST/2026/01 07.03.2026 अन्वये करारावरील शैक्षणिक संयोजक (सहायक प्राध्यापक करार तत्वावर) पदासाठी नविन भरती प्रक्रिया सुरू केलेली आहे.<br>3. सदर पदांवर नविन नियुक्ती होईपर्यंत शैक्षणिक कामकाजात खंड पड्डु नये यासाठी यादीतील क्र. 1 ते 50 शैक्षणिक संयोजक यांना पूर्वीच्याच अटी व शर्तीवर रू. 57,700/- या एकत्रित वेतनावर संबंधीत विद्याशाखा / विभाग यांच्या आवश्यकतेनुसार 1/2/3 महिन्यांची मुदतवाढ देण्यास मा. व्यवस्थापन मंडळापुढे विचारार्थ सादर.<br><br>**ठराव :** सोबत जोडलेल्या यादीतील क्र. 1 ते 50 मधील शैक्षणिक संयोजक (सहायक प्राध्यापक लेव्हल) यांचा विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये एकूण 2 वर्ष |

| | | |
|---|---|---|
| | | कालावधी संपुष्टात आलेला आहे. विद्यापीठाने जाहिरात क्र YCMOU/EST/2026/01 दि. 07.03.2026 अन्वये करारावरील शैक्षणिक संयोजक (सहायक प्राध्यापक करार तत्वावर) या जाहिरातीनुसार सदरच्या पदांची नवीन नियुक्ती होईपर्यंत संबंधीत विद्याशाखा विभाग यांच्या आवश्यकतेनुसार सदर शैक्षणिक संयोजक यांना पूर्वीच्याच अटी व शर्तीवर रू. 57,700/- या प्रतीमाह एकत्रित वेतनावर 2 महिन्यांची मुदतवाढ देण्यास व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |

**कुलगुरू तथा अध्यक्ष,**
**मा. व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव,**
**मा. व्यवस्थापन मंडळ**